


पॅस्टर टोनी अलामो | द अलामो ख्रिश्चन नेशन | खंड 21200

# सोडोम आणि गमोरा

**लेखक: टोनी अलामो**



इस्त्रायलमधील जेरिकोच्या जवळ सोडोम आणि गमोरा नावाचे एक ठिकाण आहे.[१] जर तुम्ही हे स्थळ पाहिले तर तुम्हाला निशंक:पणे असे समजून येईल की ईश्वर हा निवाड्याचा ईश्वर आहे.[२] इथे सापडलेला एखादा गंधकाचा पिवळा तुकडा तुम्ही उचलून पेटवला तर तो जळू लागतो, व गंधक आणि मीठ असणारे इथले पर्वत पाहिले असता असे वाटते की ईश्वराने या पर्वतांचे वरचे भाग कापून त्याचे मोठे तुकडे बनवले आहेत आणि आपल्या मुठींनी आवळून त्यांचा चुरा केला आहे आणि त्याचे ढीग बनवून, त्यांना गंधक व मीठामध्ये घोळवून आग लावली आहे. हे दृश्य खूपच भयानक आहे. इथले गंधकाचे तुकडे तुम्ही इथल्या आठवणींसाठीचे स्मृतीचिन्ह म्हणून घरी नेऊ शकता. हे तुकडे जरा जास्तच घ्या कारण, जेव्हा काही अनिष्ट चालीरितींना मान्यता देण्यासाठी जनमत विचारात घेतले जाईल, त्यातल्या काहींचा उपयोग तुम्हाला मतपेटीत टाकण्यासाठी होईल उदा. समलिंगी विवाहाला मान्यता द्यावी की नाही? यासारखे प्रश्न.! ईश्वराचे वचन खोटे आहे असे कधीच जनतेला सांगू नका कारण ईश्वराच्या वचनामुळे आपल्याला खरे-खोटे, योग्य-अयोग्य, चांगले-वाईट यातील भेद समजून येतो.[३]

पवित्र भूमितील इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा हा पूर्ण प्रदेश अत्यंत गरम आहे तसेच या भागात जीवसृष्टीही नाहीच. इथे जवळच मीठाचे मोठे पर्वत आहेत.[४] जॉर्डन नदीचे कितीही पाणी मृत समुद्रात गेले तरी मृत समुद्र अत्यंत खारट असल्यामुळे त्यात कोणताही जलजीव किंवा मासे, पाणवनस्पती निर्माण होणार नाहीत किंवा त्या पाण्यात सोडले तर जिवंत रहाणार नाहीत. सतत दरडी कोसळल्यामुळे हा प्रदेश उजाड माळरान झाला आहे आणि “इंगेडी” म्हणजे मेंढीचा डोळा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी असलेल्या हॉटेल्सच्या जवळच जमिनीवर एक मोठे विवर(खड्डा) आहे. या भागांत तीन मोठी व दहा लहान हॉटेल्स आहेत व सर्वांमध्ये पोहोण्याच्या तलावांची सुविधा उपलब्ध आहे. इंगेडीपासून बिरशेबाकडे मागच्या बाजूने जाणाऱ्या रस्त्यावर हे मोठे विवर(खड्डा) व प्रत्यक्ष विध्वंस आहे. तुम्ही या विवराच्या कडेला उभे राहिलात तर त्यामागे तुम्हाला कोसळलेल्या दरडी, आणि सोडोम आणि गमोरा पहायला मिळतील तसेच ईश्वराने केलेल्या संहारामुळे झालेला नाशही पहायला मिळेल. या विवरामागे ढगांनी आणि धुक्याने झाकलेले पर्वत पहायला मिळतात. इथली भयाण शांतता आणि उजाड माळरान तुम्हाला उदास व नाखुष करते. हे विवर अतिशय रूंद असून त्याचा तळ पहाणे जवळजवळ अशक्यच आहे.

इथल्या जमिनीत कितीतरी मोठी विवरे आहेत—पृथ्वीवरील जमिनीचे विभाजन करण्याइतपत ही विवरे मोठी आहेत.--- यामुळेच सोडोम आणि गमोराचा विनाश होवून ते जमिनीत गाडले गेले असावेत का? या दोन्हींमध्ये जेरिकोचा समावेश करणेही जरूरी आहे कारण सोडोम हा जेरिकोमधील एक जिल्हा आहे. जेरूसलेमकडून जेरिकोकडे जाणाऱ्या डोंगरातल्या रस्त्यावरून तुम्ही जात असाल तर विमान उतरताना कानांत जसे दडे बसल्यासारखे वाटते तसे वाटेल. जेरिको समुद्र सपाटी पासून अत्यंत खालच्या पातळीवर आहे आणि ते पृथ्वीवरील सर्वात खालच्या जागेवरचे ठिकाण आहे. याचे कारण ईश्वराने हा पूर्ण प्रदेश भग्न केला. त्यांनी केलेल्या पापांची शिक्षा त्यांना देण्यासाठी ईश्वराने पृथ्वीवर ही सर्वात खालची जागा निर्माण केली.[५]

जेरिकोचा शहरी भाग वगळता बाकी पूर्ण प्रदेश ओसाड आणि निर्जन आहे, कारण ही भूमी शापित आहे. इथे आल्यावर तुम्हाला उदास आणि दु:खी वाटते. इथली भूरचना अत्यंत खडतर आहे. इथल्या भूमीचा विकास करण्याचा, तिथे जीवसृष्टी निर्माण करण्याचा कोणीही कितीही प्रयत्न करो, तरीही तो सफल होत नाही आणि या भूमिची भरभराट होत नाही. इथे तुम्हाला उध्वस्त झालेल्या गुहा किंवा घरे दिसून येतील. इथे अगदी कमी लोक रहातात आणि हे लोक मुख्यत्वे मेंढपाळ आहेत. त्यांची जीवनशैली अत्यंत खडतर आणि दुष्ट प्रकारची आहे आणि त्यांचे चेहरेही तसेच खडतर दिसतात.

आजही इथे लोक येतात, ईश्वराने इथे उधळण केलेल्या गंधकाचे तुकडे उचलतात, आणि स्मृतीचिन्हे म्हणून उचललेले हे गंधकाचे तुकडे काडीपेटीने पेटवतात. थडगी उकरणारे चोर आणि पुरातत्वशास्त्रज्ञ या प्रदेशांत नेहमी येतात. चोर रात्रीच्यावेळी येतात आणि मृतदेह, बरण्या, कप, दागिणे आणि फर्निचर इत्यादींचा शोध घेतात, जेणेकरून या वस्तू पुरातत्वशास्त्रज्ञांच्या हाती लागणार नाहीत. ते खडक व गंधकातील उध्वस्त गुहा आणि घरे खांदून पाहण्याचा प्रयत्न करतात.

इथे झालेल्या महाभयानक विनाशाची व्याप्ती पाहता या भागावर ईश्वरी कोप किती प्रचंड प्रमाणात झाला आहे आणि ईश्वराने या प्रदेशाला कशी शिक्षा दिली आहे ते दिसून येते. कारण सोडोम आणि त्याच्या आसपासची खेडी

*(पान ४ वर पुढे सुरू)*

---

**१** जन. १८:२०-३३, १९:१-२९, ड्यूश. २९:२३ **२** जन. प्रकरण. ६-७, नंबर . ११:१, ड्यूश. ४:२४, १०:१७, ३२:४ १५-१६, १९-२६, ३५:४३, पीसा. २:१-५, १२, ७:११-१२, ११:५-६, २१:८-९, इसा. ३०:१-३ ३०, ३३, ६६:१५-१६, २४, जेर. ७:२०, १०:१०, २१:११-१४, लॅम. ४:११, नाह. १:२-८, मॅथ. २५:३१-४६, २ कोर. ५:१०-११, हिब. १०:३०-३१, २ पिट. २:४-९ ज्युड ७, रेव.. १४:९-११, २०:११-१५ **३**एक्स. २०:१-७, ड्यूश. ५:१-२१, जोश. १:८, पीसा. ११९:९, १०४-१०५, १३०, प्रोव. ६:२३, माल.४:४, जॉन ५:२४, ८:३१-३२,१२:४८, १५:३, २ टिम. ३:१५-१७, जेम्स१:२१-२५, २ पिट. १:१९ **४** जेन. १९:२४-२६, ड्यूश. २९:२३,इसा. १३:१९-२२, जेर. ५०:४०, लॅम. ४:६, झेप. २:९ **५** जेन. १३:१३, १८:२०-२१, १९:१-१३, २४-२५, इझेक. १६:४९-५०,ज्युड ७

# सोडोम आणि गमोराचे स्थान

जेनेसिस १९:२७-२८ सांगते, "त्याच दिवशी पहाटे अब्राहाम उठला आणि तो परमेश्वरासमोर ज्या ठिकाणी उभा राहिला होता तेथे गेला. त्याने तेथून सदोम व गमोरा नगराकडे व संबंध खोऱ्यातील तळवटीच्या प्रदेशाकडे नजर टाकली तेव्हा त्या प्रदेशातून भट्टीच्या धुरासारखा धूर वर चालला होता.

१९८० च्या सुरवातीच्या काळात, बायबलमध्ये उल्लेख केलेल्या जागांचे उत्खनन करणारा पुरातत्वशास्त्रज्ञ, रॉन वायेट्स यांना मृत समुद्राच्या किनाऱ्यावरून फिरताना काही विचित्र आकाराचे बांधकाम नजरेला पडले. एखाद्या शहरातील इमारतींच्या भिंतीसारखे हे आकार दिसत होते व त्यांचा रंग पांढुरका होता. त्यानंतर बरीच वर्षे त्याने या गोष्टींबाबत काहीच संशोधन केले नाही. परंतु १९८९ मधे, रॉनला असा काहीतरी शोध लागला की ज्यामुळे त्याला खात्रीलायकरित्या हे कळले की हे पांढुरके आकार म्हणजे भूगर्भक स्थितीमुळे तयार झालेले आकार नक्कीच नव्हेत.

**भूगर्भीय थरांहून अधिक काहीतरी:**

रॉनला या पांढुरक्या रंगाच्या आकारांमधून जाणारा एक रस्ता दिसून आला आणि त्या पांढऱ्या रंगाच्या आकारावर आतील बाजूने काही थर असल्याप्रमाणे दिसून आले ज्यावरून हे सिध्द होत की हे तयार झालेले आकार म्हणजे केवळ भूगर्भीय थर नसून नक्कीच आणखी काहीतरी वेगळी गोष्ट होती.

बायबलमध्ये या गोष्टींचा काही उल्लेख सापडतो का हे पहाताना, रॉन व त्याची पत्नी, मेरी नेल, यांना काही लेखी संदर्भ आढळले ज्यामध्ये चार शहरांनी कॅननाईट्सच्या सीमा तयार केल्याचा उल्लेख आढळतो.

"कॅननाईटची सीमा उत्तरे कडील सोडोमपासून दक्षिणेकडील गरारापर्यंत व पश्चिमेकडील गाजापासून तर पूर्वेस सोडोम व गमोरा पर्यंत तसेच आदमा पासून व सबोईम पासून व लेशापर्यंत पसरली होती (जेनेसिस - १०:१९).

जर सोडोम, गमोरा आणि एडमा, झिबोम ही ठिकाणे जर मृत समुद्राच्या दक्षिण टोकाला एकाच सर्वसाधारण जागी असतील तर या सर्वांचा सीमा दर्शक म्हणून उल्लेख करणे खरेतर विचित्रच ठरेल. ही ठिकाणे जर सीमादर्शक म्हणून मानली गेली असतील तर ती शहरे एकमेकांपासून काही अंतरावर वसली गेली असतील असे मानणे तर्काला धरून आहे.

रॉनने पाहिलेल्या जागांचे स्थान पन्नास किंवा त्याहून अधिक मैलांपर्यंत पसरलेले होते. त्यातील एक जागा जेरिओच्या उत्तरेला स्थित होती व तिचा उल्लेख तंतोतंत बायबलमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे होता याचा अर्थ हा की झिबोम मृत समुद्राच्या उत्तरेला वसलेले होते.

"शौल, त्याचा पूत्र योनाथन व त्यांच्याबरोबर असलेले लोक बेंजामिनचे गिबॉन येथे राहिले. फिलिस्तिनी मिखमाश येथे तळ देवून राहीले. मग फिलिस्तिनींच्या छावणीतून लुटालुट करणारे लोक तीन टोळ्या करून निघाले एक टोळी शुवाल नामक प्रांताकडे आफ्राच्या वाटेने गेली. दुसरी टोळी बेथ होरोनच्या वाटेने गेली आणि तिसरी टोळी सबाईम खोऱ्यातील प्रांताच्या वाटेने रानाकडे गेली. (१ सॅम्युएल १३:१६-१८).

१९८९ च्या नंतरच्या काळामध्ये, रॉन आणि त्याची पत्नी, मेरी नेल वॅट यांनी मासादा लगतच्या खालच्या जागेला भेट दिली आणि त्या पांढुरक्या दगडांचे नमुने गोळा करून हातात घेतले तेव्हा त्यांच्या हातामध्येच त्या तुकड्यांचा भुगा झाला आणि चेहऱ्याला लावायच्या पावडरप्रमाणे बारीक चुरा झाला. त्यावेळी मेरी नेल वॅट यांना घट्ट होऊन जमा झालेल्या राखेत, जडवलेली एक कॅप्सुल सापडली, परंतु ते नक्की काय होते याबद्दल काहीच निष्कर्ष काढता आला नाही.

ऑक्टोबर १९९० मध्ये, रॉन वॅट आणि रिचर्ड राईव्ह या भागांत परत आले व जेव्हा त्यांनी मासाडाखालील प्रदेशाची तपासणी केली तेव्हा त्यांना तिथे नुकताच पाऊस होऊन




*सोडोम आणि गमोरा मध्ये दिसून आलेले मातीचे थर*



*रॉन वॅटला सोडोम आणि गमोरा च्या प्रदेशामध्ये सापडलेल्या*

गेल्याचे आढळले. त्या भागांत फेरफटका मारत असताना रिचर्डला लांबवर एखाद्या गुहेसारखे काहीतरी दिसले. जवळ जाऊन त्यांनी ते पाहिले असता तिथे त्यांना राखेचा एक भला मोठा तुकडा वरून खाली पडल्याचे दिसले-कदाचित नुकत्याच झालेल्या पावसामुळे तो तुकडा खाली पडला असावा. जेव्हा रॉन हे पहात थांबला होता तेव्हा त्याला त्या राखेच्या आतमध्ये अनेक  छोटे बॉलसारखे पिवळसर गोळे दिसले, त्या गोळयांच्या सभोवताली लालसर काळया रंगाची रेघ  होती. त्या गोळय़ांकडे निरखून पहात असताना, त्याला समजले की ते गंधकाचे तुकडे होते व त्या राखेमध्ये सर्वच गोळे गंधकाचेच होते.

अशा रितीने गंधकाचा शोध लागल्यानंतर वॅटेने पुरातत्व संशोधनातर्फे हा शोध सुरू केला की या प्रकारातले गंधक इतर कुठे पहायला मिळते का ते पहावे. त्यानंतर रॉन व त्याची पत्नी, मेरी नेल वॅट आणि रिचर्ड राईव्हज् यांनी स्मिथसोनियन इन्स्टियूट वॉशिंग्टन डी.सी.येथे जाऊन तिथल्या गंधकाच्या संग्रहाचे परीक्षण केले तेव्हा त्यांना तिथे कुठलाही गोल प्रकारचा गंधकाचा गोळा दिसला नाही. शिवाय तिथला कुठलाही तुकडा वरील गोळयांप्रमाणे आवरणांत गुंडाळलेला दिसत नव्हता. त्यांनी स्मिथसोनियन इन्स्टियूटला विनंती केली की त्यांना सापडलेल्या गंधकाच्या गोल गोळयांचे परीक्षण करण्यात यावे तेव्हा जगभरामध्ये असलेल्या ५० हून अधिक प्रकारच्या गंधकाच्या कोणत्याही तुकड्यांमध्ये रॉनला सापडलेल्या या “पठारांच्या शहरांतल्या”तुकडयांचा सारखेपणा नव्हता.



*राखेच्या अवशेषांमध्ये परिवेष्टित गंधकाचे छायाचित्रे*

मृत समुद्राजवळ गंधकाचे तुकडे सापडणारा, रॉन वॅट हा कोणी एकटाच व्यक्ती नव्हता. जेव्हा १९२४ मध्ये  विल्यम अल्ब्राईट आणि मेल्विन केल हे दोघे सोडोम आणि गमोरा या शहरांचा शोध घेण्यास निघाले होते तेव्हा त्यांनाही मृत समुद्राच्या दक्षिणेला असे गंधकाचे तुकडे आढळले होते.

“... ज्या प्रदेशांत गंधकाचा वर्षाव करणारा पाऊस होतो तिथे अर्थातच सर्वत्र गंधकच पहायला मिळते. आम्हाला शुद्ध गंधकाचे तुकडे सापडतील, त्यातले काही तर माझ्या अंगठया इतके मोठे आहेत मृत समुद्राच्या पश्चिमेकडे असलेल्या पर्वतावरची चिकणमाती त्यात मिसळली आहे आणि आतातर समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरच्या सीमेपासून चार-पाच मैल अंतरापर्यंत ते तुकडे पहायला मिळतात. या पूर्ण पठारावर सर्वत्र, दूरपर्यंत हे गंधकाचे तुकडे पसरले गेले आहेत.” (एक्सप्लोरेशन ऐट सोडोम –लेखक- डॉ. मेल्विन केल १९२८, पान क्र.५२-५३)

राखेचे भस्म आढळणारा मेल्विन केल हादेखेल पहिला व्यक्ती नव्हता. या शहरांबाबतच्या इतर नोंदी जोसफस यांच्या “वॉर्स ऑफ द ज्यूज” ,पुस्तक क्र. IV, धडा VIII मध्ये पहायला मिळतात:

“आत्ताचा हा देश तेव्हा इतक्या दु:खद रितीने जळून गेला होता की आता कोणालाच इथे यावेसे वाटत नाही.  तेव्हा ही भूमी अत्यंत समृध्द, श्रीमंत आणि आनंदी होती तरीही आता ती पूर्णपणे जळून खाक झाली आहे. आता त्या तिथल्या ईश्वरी शक्तीवर अजिबात विश्वास न ठेवणाऱ्या नास्तिक रहिवाश्यांचा या घटनेशी संबंध जोडला जात आहे. वीज कोसळल्यामुळे ते सारे जळून गेले आणि त्याचा परीणाम म्हणून  तिथे अजूनही ती दैवी आगीचे अवशेष बाकी आहेत; आणि त्या पाच शहरांचे अंश (किंवा सावल्या)सुध्दा अजूनही पहायला मिळतात....”

या भस्म झालेल्या जागेंचे जोसेफने केलेले वर्णन अतिशय योग्य आहे.:

**“हे सर्व आता पूर्णपणे जळून खाक झालेले आहे.”**

सोडोम गमोरा आणि “सर्व पठाराबाबतच्या “नाशाची हकिकत ही काही परीकथा नव्हती. तर बायबलमध्ये दर्शवल्याप्रमाणे हुबेहुब घडून आलेली एक ऐतिहासिक घटना होती.

http://www.wyattmuseum.com/cities-of-the-plain.htm

## सोडोम आणि गमोरा

*(पान १ वरून पुढे सुरू)*
वगळता इस्त्रायलची पूर्ण भूमी हिरवीगार आहे आणि तिची भरभराट सुध्दा झालेली आहे. ईश्वर लवकरच या पृथ्वीवर आणि संपूर्ण जगांत पुन्हा एकदा विनाश घडवून आणणार आहे.[६]

अमेरिकेमध्ये आपण कधीही ९.२ रिश्टर स्केलहून जास्त मोठा भूकंप अनुभवलेला नाही. परंतु सोडोम आणि गमोरा मध्ये जो भयानक विनाश झाला तो जर रिश्टर स्केलमध्ये मोजला तर त्याचे प्रमाण २५.० किंवा त्याहून अधिकच आढळेल. आग लागणे आणि लोकांवर गंधकाच्या तुकड्यांचा वर्षाव होणे या गोष्टींचा विचार केला तर लोकांमधील अनिष्ट लैंगिक व्यवहार जसे की समलैंगिकता आणि विवाहेतर संबंध या सारख्या पापांमुळे या आपत्तींना तोंड द्यावे लागते असे म्हणता येईल.[७]

हा पूर्ण प्रदेश सर्व लोकांना व खास करून जे लोक समलिंगी संबंध आणि स्त्री समलिंगी संबंध चालू ठेवण्याची शिफारस करतात त्या सर्व अनीतीचे धडे शिकवणाऱ्या लोकांना, ईश्वर खरोखरचं अस्तित्वात असतो याची साक्ष देतो. हे सर्व पाहिल्याबर तुम्हाला समजेल की ईश्वर ही काही उगाच थट्टा मस्करी करत नाही. तो जे सांगतो ते सत्य असते. [८] आता वेळेचा अंत झाला आहे म्हणूनच जेव्हा तुम्ही खाली दिलेली प्रार्थना म्हणाल तेव्हा त्या प्रार्थनेची मस्करी करू नका:

**“हे प्रभू आणि हे ईश्वरा, माझ्या आत्म्यावर, एका पाप्यावर दया कर.[९] माझा विश्वास आहे की येशू ख्रिस्त हा जिवंत ईश्वराचा पुत्र आहे.१० माझा विश्वास आहे की त्याने माझी आधीची सर्व पापे माफ व्हावीत यासाठी तो सुळावर मृत्यू पावला आणि स्वत:चे मौल्यवान रक्त सांडले.[११] माझा विश्वास आहे कि ईश्वराने पवित्र आत्म्याच्या शक्तीद्वारे येशूला मृतावस्थेतून उठवले आहे,१२ आणि ईश्वराच्या उजव्या बाजूला बसून तो या क्षणाला माझ्या पापांचा कबुलीजबाब आणि ही प्रार्थना ऐकत आहे.१३ हे येशू ख्रिस्ता, मी माझ्या हृदयाचे दार उघडून तुला माझ्या हृदयात येण्याचे आमंत्रन देत आहे.१४ तु माझ्याऐवजी कॅवलरी येथे क्रुसावर जे रक्त सांडलेस त्या मौल्यवान रक्ताने माझी सर्व घाणेरडी पापे धुवून काढ. [१५] हे येशू ख्रिस्ता, तू मला दूर करणार नाहीस आणि माझ्या सर्व पापांना माफ करशील आणि माझ्या आत्म्याला वाचवशील. हे मला माहित आहे कारण तुझा शब्द म्हणजेच बायबल तसे सांगते[१६]. तुझा शब्द सांगतो की तू कोणालाही दूर लोटणार नाहीस आणि त्यामधे माझाही समावेश होतो.[१७] म्हणूनच मला माहित आहे की तू माझी प्रार्थना ऐकली आहेस मला माहित आहे की तू माझ्या हाकेला उत्तर दिले आहे आणि मला माहित आहे की तू मला वाचवले आहेस.[१८] हे येशू ख्रिस्ता, माझा आत्मा वाचवल्याबद्दल मी तुझे आभार मानतो आणि तुझी आज्ञा मानून आणि यापुढे आणखी कोणतेही पाप न करून माझी कृतज्ञता व्यक्त करतो [१९]**

---

मुक्ती मिळाल्यानंतर, पिता पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यात पूर्णपणे बुडवून, आपण बाप्तिस्मा घ्यावयाचा आहे२० बायबलचा नीट सखोलपणे अभ्यास करा आणि ते जे सांगते ते करा.२१

प्रभूला वाटते की तुम्ही इतरांना तुमच्या मुक्तीबद्दल सांगावे. आपण धर्मोपदेशक टोनी अलामोच्या गॉस्पेल देणाऱ्या साहित्याचे वितरक होऊ शकता. आम्ही ते आपल्याला मोफत देऊ. आम्ही आपणास हे साहित्य मोफत देवु. अधिक माहितीसाठी आम्हाला कॉल करा किंवा ई-मेल करा. हा संदेश इतरांपर्यंत पोहचवा.

जर तुम्हाला येशूच्या आदेशानुसार, हे जग वाचले जावे असे आपल्याला वाटत असेल तर ईश्वराला टायथिस आणि प्रसादापासून वंचित ठेवू नका. ईश्वराने म्हटले, मणुष्य देवाला ठकवील काय? तुम्ही तर मला ठकविले आहे; असे म्हणून तुम्ही म्हणता आम्ही कोणत्या बाबतीत तुला ठकविले आहे? दशमांश (टायथिस) आणि अर्पणे यासंबंधाने. तुम्ही एका शापाने शापित झाला आहात: कारण तुम्ही आणि या पूर्ण राष्ट्राने आणि [संपूर्ण जगाने] मला लुटले आहे.सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश (टायथिस-तुमच्या एकूण उत्पन्नाचा दहावा हिस्सा) तुम्ही भांडारात आणा म्हणजे मी आकाशकपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हाकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीती पाहा. तुमच्या भूमीच्या पिकाची नासाडी होऊ नये म्हणून ते खाऊन टाकणाऱ्यास मी तुम्हासाठी धमकावीन; तुमच्या बागेतील द्राक्षलतांचे फळ अकाली गळणार नाही असे सेनाधीश ईश्वर म्हणतो.” (मलाखी ३ :८ -१२ )

---

६ इसा. १३:३-१३, २४:१-२१, ३४:१-१०, इझेक. २२:२५-३१, २४:६-१४, प्रकरण. ३८, जोल १:१३-१५, झेप. ३:८, माल. ४:१, मॅथ. २४:३-७, २१-२२, २९-३४, ल्युक १७:२४-३०, २ थिस. १:७-१०, २ पिट. ३:३-१२, रेव. ६:१५-१७, ८:७-१३, ९:१-१९, ११:१८, १६:१-११, १७-२१, १९:११-२१ **७** जन. १९:४-१३, लेव. १८:२०, २२, २०:१, डयुश. २२:५, २३:१७-१८, जज्ज १९:२२-२८, १किंग्ज १४:२२-२४, रोम. १:१८, २४-३२, १कोर. ६:९-१०, १८, १०:८, २ कोर. १२:२१, गाल. ५:१९-२१, ईफ. ३:३-६कोल.३:५-७, १थिस. ४:३, १टिम. १:९-१०, हिब. १३:४, ज्युड. ७, रेव. २:२१, ९:२१, २२:१५ **८** नम. २३:१९, १सॅम. १५:२९, पीसा. ११९:८९, प्रोव. १९:२१, एकेल. ३:१४, इसा. १४:२४, ४०:८, जेर. ४:२८, इझेक. २४:१४, डॅन. ४:३५, मॅथ. ५:१७-१८ **९** पिसा. ५१:५, रोम. ३:१०-१२, २३ **१०** मॅथ. २६:६३-६४, २७:५४, ल्युक १:३०-३३, जॉन ९:३५-३७, रोम. १:३-४ **११** ॲक्ट्स ४:१२, २०:२८, रोम. ३:२५, १जॉन १:७, रेव. ५:९ **१३** पिसा. १६:९-१०, मॅथ. २८:५-७, मार्क १६:९, १२:१४, जॉन २:१९, २१, १०:१७-१८, ११:२५, ॲक्ट्स २:२४, ३:१५, रोम. ८:११, १ कोर. १५:३-७ **१३** ल्युक २२:६९ ॲक्ट्स २:२५-३६, हिब.. १०:१२-१३ **१४** १ कोर. ३:१६, रेव. ३:२० **१५** ईफ. २:१३-२२, हिब. ९:२२, १३:१२, २०-२१, १ जॉन १:७, रेव. १:५, ७:१४ **१६** मॅथ. २६:२८, ॲक्ट्स २:२१, ४:१२, ईफ. १:७, कोल. १:१४ **१७** मॅथ. २१:२२, जॉन ६:३५, ३७-४०, रोम. १०:१३ **१८** हिब. ११:६ **१९** जॉन ५:१४, ८:११, रोम. ६:४, १कोर. १५:१०, रेव. ७:१४, २२:१४ **२०** मॅथ. २८:१८-२०, जॉन ३:५, ॲक्ट्स २:३८, १९:३-५ **२१** ज्यूश. ४:२९, १३:४, २६:१६, जोश. १:८, २२:५, २ टिम. २:१५, ३:१४-१७, जेम्स १:२२-२५, रेव. ३:१८

*कृपया अधिक माहितीसाठी व तुम्हाला रस वाटू शकेल अशा इतर विषयांवरील लेखनसाहित्यासाठी आमच्याशी संपर्क करा.*

**टोनी अलामो, जागतिक पॅस्टर, टोनी अलामो ख्रिश्चन मिनीस्ट्रीज वर्ल्डवाईड, पोस्ट बॉक्स २९४८ , हॉलिवूड, कॅ. ९००७८**
**प्रार्थना व माहितीकरिता २४ तास उपलब्ध: (६६१ ) २५२ -५६८६ • फॅक्स (६६१ ) २५२ -४३६२**
**www.alamoministries.com • taoffice@alamoministries.com**

*यू.एस.मधील ज्या व्यक्तीं, आपले तन, मन, हृदय, ताकद व आत्मा अर्पून ईश्वराची सेवा करतील, अशा व्यक्तींना जगभरातील, टोनी अलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रिज, अशी जागा पुरवते की जिथे जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळतील*

**न्यूयॉर्क शहरांत दर मंगळवारी रात्री ८ वा. व इतर ठिकाणी प्रत्येक रात्री सेवा आयोजित करण्यात येतात.अधिक माहितीसाठी कृपया (९०८ ) ९३७ - ५७२३ या क्र.वर फोन करा.**

प्रत्येक सेवेनंतर जेवण दिले जाईल.

ख्रिश्चन पॅस्टर अलामो यांनी लिहिलेले पुस्तक “द मसीहा” मागून घ्या. यामध्ये जुन्या करारामधील ३३३ च्यावर गोष्टींतून ख्रिस्ताबाबतचा पुरावा दिला आहे.

*धर्मोपदेशक अलामो यांच्या लेखी साहित्याचे वाटप करून लोकांची आत्मोन्नती करणारे सेवक म्हणून काम करा.*

*आमचे सर्व लेखी साहित्य व ऐकण्याचे संदेश ,शिपिंग शुल्कासह, नि:शुल्क पाठवले जातात.*

*जर त्यासाठी कुणी तुमच्याकडून पैसे घेत असेल तर कृपया पुढील क्र. वर फोन करा. (६६१ ) २५२ -५६८६ कलेक्ट.*

**या लेखी साहित्याद्वारे मुक्तीसाठी खरा मार्ग कोणता हे दाखवले जाते. (प्रेषितांची कृत्ये४ :१२ ).**

**हे साहित्य फेकू नका. कृपया दुसऱ्या कोणाला तरी ते वाचायला द्या.**

**जे कोणी दुसऱ्या देशांमध्ये असतील त्यांनी कृपया हे साहित्य त्यांच्या देशांतील बोली भाषांमध्ये अनुवादित करावे.**

**जर आपण हे साहित्य पुन्हा प्रकाशित करणार असाल तर कृपया खालील कॉपीराईट व रजिस्ट्रेशनचा समावेश करा.**

© कॉपीराईट एप्रिल २०१५ सर्व हक्क राखीव जागतिक पॅस्टर, टोनी अलामो. ® एप्रिल २०१५ मध्ये नोंदणीकृत केले.

MARATHI—VOLUME 21200—*SODOM AND GOMORRAH*